पोलीस निरीक्षक कार्यालय उमरी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** उमरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0067  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/03/2023 19:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 24/03/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/03/2023
   **Time From (वेळेपासून):** 12:40 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/03/2023  **Time (वेळ):** 18:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/03/2023 18:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रशासकीय ईमारती मधील पंचायत स

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गणपती माधवराव ढगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अब्दुल्लापुर ता उमरी ,उमरी,उमरी,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अब्दुल्लापुर ता उमरी ,उमरी,उमरी,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888278292

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विना गुणवंतराव सुर्यवंशी | आठवले | | 1. गंगा कॉलनी छत्रपती चौक नांदेड,नांदेड,उमरी,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्रं.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांकः-24/03/2023

मी गणपती माधवराव ढगे, वय 24 वर्श, व्यवसाय शेती, मुळ रा. अब्दुल्लापुर ता. उमरी, जि. नांदेड मो.नं. 8888278292.

ला.प्र.वि.नांदेडचे पथकासोबत पोलीस स्टेशन उमरी येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहाणारा असुन, मला एक भाऊ व एक बहिण आहे. माझी आई कांताबाई, भाऊ हणमंत भावजय शिवाणी, व बहीन अश्वीनी, असे आहेत. आमची शेती अब्दुल्लापुर शिवारात आहे. भाऊ हणमंत हा सध्या औरंगाबाद येथे कंपनीत असुन तेथे त्याचे कुंटूबासह राहतो.

सन 2022-23 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजणे अंतर्गत भाउ हणमंत याचे नावावर असलेल्या अब्दुल्लापुर शिवारातील गट क्रं.30/3/1 मधील 68 आर या शेतीकरीता 33 फुट गोल व 33 फुट खोल अकाराचे विहीरीचे बांधकाम करण्याकरीता पंचायत समिती उमरी कडुन मंजुरी मिळाली होती. त्या प्रमाणे मनरेगा जॉबकार्ड धारकाकडून विहीरीचे खोदकाम केले. त्या मजुरीचे पैसे त्या मजुरांचे खात्यावर एकुण 184321/-रूपये शासनाकडुन जमा झाले

जानेवारी 2022 मध्ये विहीरीच्या कॉन्क्रेटीकरणाचे काम भाउ हणमंत ढगे यांनी स्वतःच्या जवळचे पैसे टाकुण पुर्ण करून घेवुन तो औरंगाबादला गेला. या करण्यात आलेल्या कामाचे उर्वरीत अनुदान 95442/- रूपये मंजुर होवुन मिळण्याकरीता करण्यात आलेल्या कामाचे फोटो, केलेल्या कामाचे बिलाच्या पावत्या, घेवुन फाईल तयार करून, दिनांक 21/3/2023 रोजी पंचायत समिती उमरी येथील महिला कर्मचारी आठवले मॅडमची भेट घेवुन माझी फाईल दाखवुन कामाचे स्वरूप सांगुन फाईल स्विकारून सह्या करण्याकरीता विनंती केली असता त्यांनी फाईल स्विकारून सह्या करण्याकरीता फाईलला 3000/- रूपये लागतील म्हणुन मला लाचेची मागणी केली. लाच देणे ही कायद्याने गुन्हा असल्याने व मला लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांच्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही होण्याकरीता दिनांक 23/03/2023 रोजी दुपारी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली. पंचायत समिती उमरी येथील आठवले मॅडमशी माझी कोणत्याही प्रकारचे अर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. कोणत्याही प्रकारची पुर्व दुष्मणी वैमनस्य नाही.

मी दिलेल्या तक्रारी वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पो.नि.श्री कालीदास ढवळे यांनी माझेशी मोबाईलव्दारे संपर्कात राहुन दिनांक 24/03/2023 रोजी अंदाजे अकरा वाजता, दत्त मंदीर सावरगाव रोड उमरी येथे पथकासह शासकीय वाहनाने येवुन माझी भेट घेतली. त्यांनी सोबत आणलेले पंच क्रं. 1)श्री सुनिल शिवराम दर्शन,आरक्षण लिपीक 2)श्री अंगद तुळशीदास चकोर, कनिष्ठ लिपीक, दोघे नेमणुक सार्वजनीक बांधकाम विभाग नांदेड. यांचा त्याच प्रमाणे ला.प्र.वि कार्यालय नांदेड येथील पथकात सहभागी असलेले पोलीस उप अधिक्षक श्री आशोक ईप्पर, पथक सदस्य स.पो.उप.नि. श्रीसंतोश शेटे, पोलीस नाईक राजेश राठोड, महिला पो.ह.मेनका पवार, चालक पो.ह. मारोती सोनटक्के यांचा परिचय करून दिला.

पो.ना. राजेश राठोड यांनी नविन मेमरी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पो.नि. श्री ढवळे यांचे, माझे व पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. मला पंचाना पथक सदस्यांना सुचना दिल्या गेल्या. पो.ना. राजेश राठोड यांनी माझे ताब्यात डिजीटल व्हॉईस रेकॉडर चालु करून माझे गळ्यात शर्टच्या आत कोणास संशय येणार नाही अशा स्थितीत ठेवुन आठवले मॅडम यांच्या भेटी करीता 11.27 वाजता रवाना केले. मी व पंच क्रं.1) श्री सुनिल दर्शन असे माझेकडील मोटर सायकलने पंचायत समिती उमरी कार्यालयात आठवले मॅडम यांची भेट घेतली. त्यांनी पंचासमक्ष माझे फाईल मधील कागदपत्राची पाहणी केली. व ''दिड ठेवा ईथ'' मी त्यांना काय म्हणुन विचारले असता त्यांनी मला परत ''दिड ठेवुन जावा ईथे फाईल मध्ये. दहा मिनीटांनी या.'' म्हणुन दिड हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यांनी फाईल ठेवुन घेतली. मी त्यांना जावुन येतो म्हणुन वेळ मागुण घेतला. त्यानंतर मी व पंच क्रं.1) श्री सुनिल दर्शन असे पंचायत समिती उमरी येथुन निघुन पथक थांबलेल्या ठिकाणी अंदाजे 12.02



Scanned with CamScanner

वाजता पोहंचलोत. पो.ना. राजेश राठोड यांनी माझे ताब्यांतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर घेवुन ते बंद केले. पो.नि. श्री ढवळे यांनी पंच क्रं.1)श्री सुनिल दर्शन यांना व त्या नंतर मला ''भेटी दरम्यान काय घडले?'' म्हणुन विचारणा केली. आम्ही घडलेली हकिकत सांगीतली. त्यानंतर ध्वनिमुद्रीत झालेले माझे तसेच लोकसेवक महिला आठवले यांच्याशी झालेले संभाषण लॅपटॉपवर पथकाने ऐकले. लाचमागणीची खात्री झाल्या नंतर पो.नि. ढवळे यांनी अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन, प्रात्यक्षिक दाखवीले. मी हजर केलेल्या पाचशे रूपये दराची एक नोट दोनशे रूपयांच्या दोन नोटा व शंभर रूपये दराच्या सहा नोटांचे क्रंमाक पंच क्रं.2) श्री अंगद चकोर यांनी नोंदवुन घेतले. त्या नोटाना महिला पो.ह. मेनका पवार यांनी अँन्थ्रासीन पावडर लावुन लाचेची रक्कम माझे ताब्यात दिली. पो.नि. ढवळे यांनी पंचाना मला तसेच पथकातील सदस्यांना दिलेल्या सुचना प्रमाणे सापळा पुर्व कार्यवाही केली.

पो.ना राजेश राठोड यांनी 12.27 वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉडर चालु करून माझे ताब्यात दिले. मी व पंच क्रं. 1)श्री सुनिल दर्शन असे माझे मोटर सायकलने, पथक प्रमुख पथकाचे वाहनाने आमचे मागे योग्य अंतर ठेवुन, उमरी येथील प्रशासकीय ईमरातीतील पंचायत समिती कार्यालयात सापळा लावण्यात आला. मी व पंच क्रं.1)श्री सुनिल दर्शन असे महिला लोकसेवक आठवले मॅडम यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान पंच क्रं.1)श्री सुनिल दर्शन यांच्या समक्ष महिला लोकसेवक आठवले मॅडम यांना मी ''मॅडम तुम्ही म्हणल्या प्रमाणे दिड हजार आणले. मोजुन घ्या.'' असे सांगीतले. त्यांनी मला त्याच्या समोर असलेल्या माझे फाईलकडे ईशार करून ''ठेवा तिथे त्या फाईल मध्ये ठेवा.'' म्हणुन सांगीतले. मी त्यांना ''माझ्या फाईल मध्ये ठेवु का?'' म्हणुन विचारले. तेंव्हा त्यांनी '' ठेवा....... ....ढगे कुठे गेला ?'' असे विचारून ''आर्ध्या तासाने या.'' म्हणुन जाण्यास सांगीतले. त्यांच्या सांगण्या प्रमाणे मी लाचेची रक्कम 1500/- रूपये त्यांच्या समोर असलेल्या आमच्या फाईल मध्ये ठेवली.

त्यांनतर मी सुचने प्रमाणे बाहेर येवुन अंदाजे 12.40 वाजताचे सुमारास खिशातील हातरूमाल हातात धरून ला. प्र.वि. पथकास ईशारा केला. तोच ला.प्र.वि. पथकाने आठवले मॅडमचे कक्षात प्रवेश केला. पथक प्रमुख पो.नि. ढवळे तसेच पो.उप.अ. ईप्पर यांनी आठवले मॅडमला परीचय देवुन लाचलुचपत प्रतिबंधक पथकाची कार्यवाही असल्याचे सांगीतले. पो.नि. ढवळे यांनी आठवले मॅडमला लाचेची रक्कम कुठे आहे? विचारणा केली असता त्यांनी ''मी पैसे घेतले नाहीत. फाईल मध्ये त्यांनीच ठेवले.'' असे म्हणुन टेबल वरील फाईल दाखवली. पंच क्रं.2)श्री अंगोद चकोर यांनी ती फाईल उघडली. लाचेची रक्कम 1500/- मिळुन आली. त्या नोटांचे क्रं. व पंच क्रं.2)श्री अंगद चकोर यांच्याकडे नोंद असलेले क्रमांक एकच असल्याची खात्री करण्यात आली. त्या कक्षात कत्रीम अंधार करून, अल्ट्राव्हॉयलट लॅम्पचे प्रकाशात पाहणी करण्यात आली नोटांना व फाईलला अँन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली.

पो.नि.श्री ढवळे यांनी महिला लोकसेवीकेस नाव पद राहण्याचा पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्रीमती विना भ्र. गुणवंतराव सुर्यवंशी/आठवले, वय 47 वर्षे, व्यवसाय कंत्राटी लोकसेवक पद सहायक कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती उमरी, रा. गंगा कॉलनी, पुर्णा रोड, पावडे मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती चौक, नांदेड असे सांगुन माहेरचे नाव विना सुधाकर आठवले असल्याचे सांगीतले.

महिला लोकसेवीका श्रीमती विना भ्र. गुणवंतराव सुर्यवंशी, सहायक कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती उमरी यांनी स्वतःच्या आर्थीक फायद्याकरीता पदाचा गैरवापर करून, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अंतर्गत मंजुर विहीरीच्या कॉन्क्रटीकरणाचे उर्वरीत अनुदान 95442/- रू. बिलाची फाईल दाखल करून घेण्याकरीता पंच क्रं.1) श्री सुनिल दर्शन यांच्या समक्ष मला 1,500/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवुन, दिनांक 24/03/2023 रोजी अंदाजे 12.40 वाजताचे सुमारास प्रशासकीय ईमारती मधील पंचायत समिती कार्यालय उमरी येथे त्यांच्या कक्षात लाचेची रक्कम फाईल मध्ये ठेवण्यास सांगुन रक्कम 1,500/- रूपये स्विकारलेली आहे.

तरी यांच्या विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत कायदेशीर कार्यवाही व्हावी म्हणुन माझी फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
tukaram vishwanath kendre
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** DGPTVKM8302
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Ganpati

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस निरीक्षक कार्यालय * उमरी *

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)**
पोलीस ठाणे अमलदार

**Name (नाव):** ravindra rajendra ka
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** PSi



Scanned with CamScanner